म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. 160
REFBK-0005141
REFBK-0005141

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. [illegible]
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
दा. [illegible] नं. [illegible]
ता. [illegible]
ठाणे.



# भिकारीण व इतर कविता

# भिकारीण व इतर कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. नं.
ता.
ठाणे

श्री. माधव व्यंकटेश मंगसुळीकर

REFBK-0005141
REFBK-0005141
१९३४

मराठी ग्रंथ संग्रहालय
५१०७

किंमत १२ आणे

प्रकाशकः—
**डी. एन. मोघे**, बी. ए.
प्रोप्रायटर,
स्कूल ॲण्ड कॉलेज बुक स्टॉल,
कोल्हापूर.

या पुस्तकाचें भाषांतर, रूपांतर वगैरे संबंधानें
पुढील सर्व हक्क लेखकानें आपल्याकडे
राखून ठेविले आहेत.

मुद्रक—
**श्री. मंगेश नारायण कुळकर्णी,**
मालक, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

# अनुक्रमणिका


| अ. नं. | कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सारेच भिकारी | १ |
| २ | भिकारीण | २ |
| ३ | अबोला | २१ |
| ४ | वसुंधरेची ओवाळणी | २२ |
| ५ | विधिची कारागिरी | २४ |
| ६ | प्रेमाची खैरात | २६ |
| ७ | अरुणोदय | २७ |
| ८ | मित्रास | २८ |
| ९ | दग्ध आशा | २९ |
| १० | विनोद | ३० |
| ११ | एव्हां कीं तेव्हां | ३१ |
| १२ | दिपवाळी | ३२ |
| १३ | अभागी जीवन | ३४ |
| १४ | हसरें फूल | ३७ |
| १५ | ग्रहण | ३८ |
| १६ | अवदसा | ४० |
| १७ | धर्म | ४३ |

| | | |
|---|---|---|
| १८ | मोहिता | ४५ |
| १९ | बेंदूर | ४८ |
| २० | सांत्वन | ५० |
| २१ | मृत्यूस | ५३ |
| २२ | प्रभो ये तातडी | ५४ |
| २३ | अभागिनीचे अश्रू | ५५ |
| २४ | तिचें वेड | ५६ |
| २५ | लाजाळूस | ५७ |
| २६ | चुकलेला वायदा | ५८ |
| २७ | चोर | ५९ |
| २८ | दीपावली | ६० |
| २९ | व्यवहार | ६१ |
| ३० | श्रीमहाराष्ट्र–शारदेस | ६२ |

# प्रकाशकाचे दोन शब्द.

श्री. माधव व्यंकटेश मंगसुळीकर यांच्या “ भिकारीण ” या लोकप्रिय लघु खंड काव्याची ही तिसरी आवृत्ति व त्यांच्या कांहीं इतर कविता रसिकांच्या सेवेला सादर करतांना मला आनंद वाटतो. ‘ भिकारीण ’ या काव्याची दुसरी आवृत्ति संपल्यास आज वर्ष दीड वर्ष होऊन गेलें. महाराष्ट्रांतील साहित्याचार्य श्री. न. चिं. केळकर, श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर वगैरे विद्वानांनीं प्रस्तुत काव्याची मुक्त कंठानें यापूर्वींच वाखाणणी केली आहे.

या तिसऱ्या आवृत्तीकरितां दे. डॉ. सावरकर यांनीं लिहिलेलें विस्तृत व विवेचनात्मक “ भिकारिणीचें प्राक्चिंतन ” कांहीं अपरिहार्य कारणास्तव छापतां आलें नाहीं. तसेंच ‘ भिकारीण ’ काव्यांतीलही बराचसा भाग त्याच कारणास्तव गाळावा लागला, याबद्दल मी दिलगीर आहें.

फक्त “ भिकारीण ” काव्याचीच तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें ठरलें होतें; परंतु माझ्या काव्यप्रेमी मित्रांनीं कवीच्या इतर कविताहि सदर आवृत्तींत छापणेविषयीं सूचना केल्यावरून त्याप्रमाणें मी श्री. मंगसुळीकर यांना विनंति केली; व त्यांनींही तितक्याच आदरानें आपल्या कांहीं कविता दिल्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें.

ब्रह्मश्री महादेवशास्त्री दिवेकर यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन कवीचा ‘ अल्प परिचय ’ लिहून देऊन मजला उपकृत केलें आहे. तसेंच कोल्हापूरचे स्टेट फोटोग्राफर श्री. बी. पी. पाटील यांनीं आपल्या संग्रहांतील कवीचा फोटो आपलेपणानें दिल्याबद्दल त्यांचा व प्रूफ तपासणेचें अवघड काम श्री. य. ब. जोशी, बी. ए., गोखले ए. सो. हायस्कूल, परळ, मुंबई, यांनीं व्यवस्थितपणें पार पाडलें याबद्दल त्यांचाही आभारी आहें. शिवाय पुस्तकाची छपाई सुबक व सत्वर करून दिल्याबद्दल मुंबई कर्नाटक प्रेसचे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांचे आभार मानावे तितके थोडेच !

शेवटीं भिकारिणीच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीप्रमाणेंच याही पुस्तकाला जनतेकडून सक्रिय सहानुभूति मिळेल अशी आशा करून हे दोन शब्द पुरे करितों.

**मुंबई,**
ता. १-१-३४.

**डी. एन्. मोघे,** बी. ए.
प्रकाशक.

# निवडक अभिप्राय

**न. चिं. केळकर, पुणें**:—आपलें भिकारीण काव्य वाचलें. काव्य करुण आहे. भाषा सोपी व साधी आहे.

**श्री. कृ. कोल्हटकर**:—आपलें भिकारीण काव्य साधें, सुबोध व ठाकठिकीचें झालें आहे.

**डॉ. सावरकर, मुंबई**:—काव्य अत्यंत रसाळ व कवीचें हृदय कळवळून निघाल्यानें हृदयविदारक असें वठलें आहे.

**वि. कृ. नेरूरकर**, बी. ए., एस्. टी. सी.:—काव्य हृदयस्पर्शी व सद्यःस्थितिदर्शक आहे.

* * *

'भिकारीण' काव्य अगदीं साधें, चाल त्याहूनहि साधी व प्रतिपादनहि अगदीं साधेपणानें केलेलें अशी यांत तिहेरी मौज साधली आहे. क्षात्र-वृत्ति जागविणाऱ्या महाराष्ट्रांत भिकारिणीसारखीं काव्यें निर्माण व्हावींत याहून लाजिरवाणी गोष्ट ती कोणती? कवि हा साधारणपणें समाजाची नाडी ओळखणारा असें समजलें जातें, म्हणून समाजानेंहि त्याच्या उद्गारांकडे दुर्लक्ष करूं नये व तें केलें जात नाहीं याची साक्ष ही तृतीयावृत्तीच देईल.

**'अज्ञातवासी.'**

* * *

'भिकारीण' अनलंकृता असावी हें उचितच होय! पण दृश्य हृदय-स्पर्शी आहे. भिकारिणीसही शीलाची मातब्बरी असते आणि तिच्या उपमर्दाची चाड मात्र न्यायनियन्त्यांना असूं नये ही गोष्ट उपेक्षणीय

नाहीं. व्यवहारांत तिची दाद लागली नाहीं तरी काव्यमंदिरांत तिची चहा झाली आहे ह्याची साक्ष ही तृतीयावृत्तीच देईल. अन्यायाचें परिमार्जन आणि गुन्हेगारास शासन करण्याचें ज्यांचें कर्तव्य त्यांनीं गरीबी-श्रीमन्ती लक्ष्यांत घेऊं नये हा हेतु ह्या कवनानें सफल होवो असें यशश्चिंतन करितों.

'यशवंत'

* * *

श्री. मंगसुळीकर कवि यांचें 'भिकारीण' हें काव्य म्हणजे एक हृदयद्रावक काव्यमय सत्यकथा आहे. मूळ प्रसंगच इतका करुणरसपूर्ण आहे कीं तो वर्णन करतांना कवीच्या भावनांचा उद्रेक एकदम उसळून आलेला आहे.

'राजहंस माझा निजला' ही कविता वाचतांना वाचकांच्या हृदयांत ज्या भावनांचा कल्लोळ उडतो, तशाच प्रकारची खळबळ भिकारीण काव्य वाचतांना वाचकांच्या अंतःकरणांत उडाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रस्तुत काव्यांतील भिकारणीच्या दुर्दैवाला कारणीभूत झालेली व्यक्ति ही अन्य धर्मीय असली तरी तसल्याच तऱ्हेच्या दुष्ट व्यक्ती आपल्या धर्मांत नाहींत, असें मात्र नाहीं. म्हणून या काव्यानें अन्यधर्मीय वाचकांच्या भावना दुखवल्या जाऊं नयेत. एवढें खरें कीं, भिकारणीच्याच बाबतींत काय पण कोणत्याही अबलेच्या संरक्षणाच्या बाबतींत आत्मसंरक्षणाची शक्ती त्यांच्या अंगांत यावयास पाहिजे. स्त्रियांकडे वाकड्या दृष्टीनें पाहाणाराचा डोळा फोडण्याची ताकद त्यांच्या अंगांत आली पाहिजे, या स्वामी श्रद्धानंदांनीं प्रतिपादलेल्या सत्याची आवश्यकता श्री. मंगसुळीकर यांनीं अत्यंत परिणामकारक रीत्या या काव्यांत पटवून दिलेली आहे. म्हणूनच त्यांचें हें काव्य सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्वाचें आहे.

**प्रल्हाद केशव अत्रे,**

बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन )

' भिकारिणीवर गुदरलेला प्रसंग खरोखर हृदयस्पर्शी आहे. आणि या प्रसंगावर रचना करितांना कवींनीं साध्या व समर्पक शब्दांची योजना केली असल्यानें, एकंदर काव्याची सजावट समाधानकारक झाली आहे.

श्री. मंगसुळीकर यांची कविता नेहमींच साधी व सरस असते व त्यांच्या इतर स्फुट काव्याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यही सरस वठलें आहे, हें नमूद करावयास मला संतोष वाटतो. असल्या छोट्या काव्याच्याद्वारें समाजजागृतीचें कार्य श्री. मंगसुळीकर यांनीं सतत चालू ठेवावें, अशी त्यांना प्रेमाची सूचना आहे.

**' काव्यविहारी '**

*　　　*　　　*

**श्रद्धानंद, मुंबईः**—हें करुणरस गीत अगदीं साधें परंतु मन संतप्त करणारें आहे. गीताचा अंत शोकरसांत झाला असून, हें गीत गात असतांना खरें काव्य प्रत्ययास येतें.

**नवाकाळ, मुंबईः**—सरळ वर्णन करून भावनांची उत्कटता व्यक्त करण्याचा कवींचा प्रयत्न चांगलाच साधला आहे.

**ज्ञानप्रकाश, पुणेंः**—या काव्याचा प्रसंग खरोखरच हृदयस्पर्शी आहे. वृत्त व भाषासरणी प्रसंगाला साधेल अशीच उपयोगांत आणली आहे.

**तरुण भारत, बेळगांवः**—हें हृदयस्पर्शी काव्य करुणजन्य आहे.

**प्रताप, मुंबईः**—प्रसंगाप्रमाणें या काव्याची मांडणी व भाषा हृदयस्पर्शी झाली आहे.

# अल्प परिचय.

भिकारीण काव्याचे कर्ते श्री. माधव व्यंकटेश मंगसुळीकर हे अथणी तालुक्यांतील मंगसुळी या खेड्यांतील राहणारे असून त्यांचें शिक्षणही खेड्यांतील राहणीच्या मानानेंच झालें आहे; तथापि त्यांची काव्यप्रतिभा इतकी दांडगी आहे कीं त्यांनीं ‘ भिकारीण ’ या काव्यापूर्वीं ‘ उधळलेलीं फुलें,’ ‘ वेणुनाद,’ ‘ राष्ट्रसेवेचा ओनामा ’ वगैरे लहान मोठीं बरींच काव्यें प्रसिद्ध केलीं आहेत. कांहीं दिवसांपूर्वीं हे कवि मिरजेस एका वकीलाकडे कारकून होते. १९३० च्या स्वातंत्र्यसंग्रामांत त्यांना नोकरीस मुकावें लागलें. अलीकडे त्यांनीं ‘ देहाचें दान ’ व ‘ इनामदाराची इज्जत ’ अशीं दोन नाटकें लिहिलीं असून ‘ गीत-वाहिनी ’ नामक काव्यसंग्रहही नुकताच प्रसिद्ध केला आहे. रा. मंगसुळीकर कवि यांच्या कविता विविध मासिकांतून व वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. तथापि सर्वांत **भिकारीण** हें काव्य अत्यंत लोकप्रिय झालें असून ही तिसरी आवृत्ति आज प्रसिद्ध होत आहे. यापूर्वींच्या दोन आवृत्त्या अवघ्या दोन वर्षांतच संपून गेल्या. अशा प्रकारचा योग एकाद दुसऱ्या कवीच्या वांट्याला आला असेल. कवीची सहृदयता, प्रसंगास साजेशी शब्दरचना, करुणरसानें ओथंबलेले प्रसंग आणि हिंदूंच्या काळजाला घरे पाडतील असे शब्दप्रयोग या काव्यांत आल्यामुळें, खरोखरीच हें काव्य कवीच्या प्रतिभेचें व अन्तःकरणाच्या उमाळ्याचें दर्शक आहे. ‘ गरिबांचा वाली नुरला ’ असा टाहो कवि सबंध काव्यांत फोडत असून गोरगरीब, बायाबापड्या, अनाथविधवा इत्यादिकांवर गुंडांचीं आक्रमणें किती होत असतील याची हें काव्य वाचून कल्पना येते.

जनावराला वाचा नाहीं तशीच स्त्रियांनाही वाचा नाहीं. विशेषतः अब्रूचे धिंडवडे निघाले कीं स्त्रिया या प्रतिकार न करतां कशा आत्महत्त्या करतात आणि अशा हजारों आत्मदानानंतर एखाद्या अबलेचीच कहाणी कशी जगापुढें येते हें सर्व पाहिलें कीं अन्तःकरणांत कालवाकालव होते.

कवि मंगसुळीकरांचें हें श्रेष्ठ दर्जाचें काव्य आहे यांत शंका नाहीं. जिच्यावर कविता केली ती भिकारीण खरी, पण तिच्यावर झालेल्या अन्यायाला कवीनें वाचा फोडल्यामुळें तिनें कवीला ५००-६०० रुपये पर्यंत मोबदलाही दिलेला आहे. कवीचें वय तिसापर्यंत आहे म्हणून अधिक कांहीं न लिहितां त्यांच्या हातून अशीच उत्कृष्ट काव्यरचना होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून हा अल्प परिचय पुरा करितों.

गीताजयन्ति शके १८५५<br>मिरज.

**महादेवशास्त्री दिवेकर.**

---

सहृदयास

मिरजेंतील कवींचा

कविता-संग्रह

# गीत-वाहिनी

—०—

किंमत ८ आणे

संपादक

माधव व्यंकटेश मंगसुळीकर

मिरज

# कवीचे निःश्वास ! !

प्रकाशक

# सारेच भिकारी !

मज भिकारिणीला पाहुन कां हो हंसतां
सारेच भिकारी जगीं विचारें बघतां
धनवन्त दिसाया दिसोत कोणी कोणी
पण खरें पहातां भिकार आम्हाहूनी
कुणि असो भूपती भिकार ठरतो तोही
सम्राट् शिकंदर अखेर रडला पाही
तो भिकारीच कीं स्वामी त्रैलोक्याचा
हव्यास तयाला आहे आत्मस्तुतिचा
कुणि हमाल यत्नें कवडी कवडी मिळवी
साम्राज्य मिळुनही कुणास आशा झुरवी
जनिं दुर्धर आशा कुणास आहे सुटली
घे मुमुक्षुही पण करिं मोक्षाची झोळी
दुनियाच भिकारी सारी यापरि असतां
मग भिकारिणीला कां हो पाहुन हंसतां
ही भरेल झोळी मुठभर धान्यें माझी
साम्राज्य मिळालें तरी तुम्ही नाराजी
मग मलाच कां हो हंसतां धिक्कारानें
क्षण पहा आपुलीं उघडुन अन्तःकरणें ।

ग्रंथ संग्रहालय वा. क्र. नं. ता. ठाणें

ग्रंथ संग्रहालय वा. क्र. ५१६



मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं.

# भिकारीण

हा पहा विषाचा पेला । मी आलें सिंचायाला
हें सगळें तुमच्यासाठी । घ्या किंवा पचवा त्याला
ही माझी करुण कहाणी । या हो या ऐकायाला

मी आणिक माझी सोनी
गांवांत भीक मागोनी
जगविला जीव दोघींनीं

त्रास ना कुणाला दिधला । गरिबांचा वाली नुरला

हरपली जिवाची ठेव । शोधिते कालपासोनी
एकटीच आपण गेली । भिक्षेस लाडकी सोनी
जरि होई बाळ भुकेली । तरि कुठें अन्न वा पाणी

पापी मी ऐसी माता
जाळिते आठवण चित्ता
लागली घोर ही चिन्ता

भेटेल कशी मम बाला । गरिबांचा वाली नुरला

पोळती पाय ज्वाळांनीं । होतसे जिवाची होळी
दैन्यांत कंठिते दिन हे । ना पर्वा कसली केली
बाळेवर जीवित सारें । प्रेमांत वृत्ति रमवीली

मी अनाथ दुबळी ऐसी
डोळ्यांनीं अन्धहि तैशी
आधार तिचा सर्वस्वी
तोहि कसा आतां तुटला । गरिबांचा वाली नुरला

साहुनी कष्ट तिजसाठीं । मी घालविलें आयुष्य
अन्नहि मिळेना पोटा । जगण्यांत नसे स्वारस्य
लक्तरें शरीरीं असलीं । हें भिकारिणीचें दृश्य
फिरफिरुनी दारोदार
मिळवावे तुकडे चार
आमुचा कुणा दरकार
जिव जगला किंवा मेला । गरिबांचा वाली नुरला

भोगण्या क्लेश मम जन्म । घातलें काय देवानें
मी माय, पोर ती माझी । अन्नाविण जगतीं फिरणें
ही करुणस्थिति तुज देवा । होतसे कशी रे बघणें
करुणेशा करुणागारा !
तुजविना कुणाचा थारा
किति छळ हा दीनोद्धारा
पावना ! पाव पतितेला । गरिबांचा वाली नुरला

करु शोध तियेचा कोठें । जाहला जगीं अन्धार
दुर्दैवा, साधिसि दावा । साहुं कशी दुःख प्रहार ?
असहाय अशा अन्धेला । प्रभु एक तुझा आधार

ही पापी दुनिया सारी
स्वार्थानें भरली भारी
दीनांचा हरि कैवारी

हो साह्य अशा समयाला । गरिबांचा वाली नुरला

अंधेची मम ही काठी । घेतली हिरावुन कोणी
लाभलें पुण्य त्या मोठें । नीच अशी करुनी करणी
कुणि दुष्टें साधुनि सन्धी । ठेविली कुठें लपवोनी

मी काय कुणाचें केलें
कां दुःख मला हें दिधलें
बाळेला मी अन्तरलें

हो विकल चित्त या काला । गरिबांचा वाली नुरला

ऐशा या संकटसमयीं । नच धीरहि देई कोणी
नसतील कुणा कां जगतीं । मज समान आया बहिणी
सारखे चहुंकडे फिरुनी । म्हणते मी 'सोनी सोनी'

परि दया न येई कोणा
कोणी तरि करुनी करुणा
द्या शोधुनि माझ्या प्राणा
विनविते दयावन्ताला । गरिबांचा वाली नुरला

गतकालस्मृति मज होतां । भडभडुनी येतें मजला
ही माझी कर्मकहाणी । ऐकेल कोण या काला
काळाची विपरित करणी । सांगते सकल जगताला
सत्कुलांत माझा जन्म
सत्कुल तें पतिचें सदन
स्थिति आज परी किति दीन
दुर्दैवी ही मी अबला । गरिबांचा वाली नुरला

ज्या काळीं या जगतांत । मम नाथ जिवाचे होते
दु:खाचें नुसतें वारें । मजला लव शिवलें नव्हतें
तें सौख्य अहा ! तेव्हांचें । बाळेच्या नशिबीं नव्हतें
प्रेमाच्या पहिल्या काला
जन्म तिचा नव्हता झाला
आठवतां येइ उमाळा
गेलाच काळ तो गेला । गरिबांचा वाली नुरला



मराठी ग्रंथ संग्रहालय
वा.
ता.
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय

मज गेले सोडुनि नाथ । त्यांच्यासह सारें गेलें
जन्माची खूण म्हणोनी । पोरीला स्वाधिन केलें
बारसें आणि बारावें । एकदांच नशिबीं आलें

पाठीस बांधुनी पोर
लोकांच्या दारोदार
पसरुनी फाटका पदर

वाढा हो म्हणते मजला । गरिबांचा वाली नुरला

पंधराहि पुरते दिवस । पोरीला झाले नव्हते
पोटाशि घेउनी तिजला । भटकणें रान माळातें
सांभाळ तियेचा केला । दुरवस्था सांगु कुणातें

करवंदी जाळी भंवतीं
गवताच्या गादीवरती
निजविली बाळ माझी ती

गाउनि मी अंगाईला । गरिबांचा वाली नुरला

न्हाणिन मी सोनुकलीला । डोळ्याचें सांडुनि पाणी
मी पाहिन डोळे भरुनी । ती माझी राजस राणी
ऐकीन तिच्या मधुबोला । मंजुळशा केव्हां फिरुनी

दीनेचा केला घात
किति करूं असा आक्रान्त
देवा ! किति बघशी अन्त
कंठांत प्राण हा आला । गरिबांचा वाली नुरला

तारुण्य भराला आलें । सुकुमार रूप सुंदर तें
पाप्याची दृष्टी पडतां । ओढवेल संकट मोठें
लावण्य संपदा तिजला । या स्थितींत घातक गमते
कल्पना धांवती स्वैर
मन शंका घे अनिवार
हा मुक्या मनाला मार
सोसवे न आतां मजला । गरिबांचा वाली नुरला

मम दैव असे हें फुटकें । हे खेळ तयाचे असती
हतभागी जीवालागीं । कोठली सुखाची शान्ती
कोणत्या जन्मिचें कर्म । ओढवलें माझ्या पुढतीं
शोधितां जीव हा शिणला
बाहतां कंठ मम सुकला
भेटवी प्रभो झणिं तिजला
शरण मी तुझ्या चरणाला । गरिबांचा वाली नुरला

× × ×

ती माय पडे धरणीला । लागुनी ध्यास बाळेचा
तें मातृहृदय ममतेचें । ढांसळे मेरु धैर्याचा
न्हाणिली भूमि ती सारी । लोटतां पूर अश्रूंचा

सारखी मोकले धाय
बापुडी अभागी माय
तळमळे तडफडे हाय !

आशेचा तंतू तुटला । गरिबांचा वाली नुरला

× × ×

इतक्यांत धाउनी आली । चुकलेली हरणी भ्याली
आईच्या स्कंधीं पडुनी । फोडिली करुण किंकाळी
आई गे आई म्हणतां । क्रन्दनें भूमि थरथरली

ती माय लेकरें तेथें
भेटली एकमेकातें
कुरवाळुनि माता पुसते

"होतीस कुठें तूं बाळा" । गरिबांचा वाली नुरला

× × ×

गात गात मी फिरतांना । कुणि मागुनि बोलवि मातें
चल माझ्या सदनीं पोरी । घालीन भीक मी तूतें
भिक्षेची हांव धरोनी । त्यामागुन गेले माते !

दैवाची न कळे करणी
गेले मी त्याच्या सदनीं
आलें मग माझ्या ध्यानीं
हा मांग फसवितो मजला । गरिबांचा वाली नुरला

तो नीच गुंड गे होता । कळलें हें नंतर मजला
आमीष दावुनी अधमें । घातली कडी दाराला
आसुरी करुनिया हास्य । बोलला भयद बोलाला
" इश्कबाज तरुणी असशी
कां उगाच नखरा करिशी
दुःखांत दिवस घालविशी "
अवचित तो घाली घाला । गरिबांचा वाली नुरला

अंधार कृष्ण रात्रीचा । दिवसाहि तिथें मज दिसला
घाबरी जाहल्यें फार । अंगावर कांटा आला
येणार कोणता पुढतीं । तो प्रसंग मज जाणवला
त्या बघतां थरके चित्त
तो भीषणसा एकान्त
पातला काळ कल्पान्त
मज लगट कराया सजला । गरिबांचा वाली नुरला

मज कपट तयाचें कळलें । नेत्रा मम चढली लाली
प्रतिकार करावा कैसा । भीतीनें तनु थरथरली
मी अभागिनी अन् पापी । भगवन्त केविं मग वाली

विनवणी तयाची केली
परि दया न त्याला आली
अश्रूंची गर्दी झाली

कांहींच दिसेना डोळां । गरिबांचा वाली नुरला

संतापें झालें अन्ध । परि अबला, शस्त्र न हातीं
करूं काय तशा समयाला । काळाच्या काळा पुढतीं
हे अधमाधम कामान्ध । अबलांची अब्रू घेती

पाझर नच देवा फुटला
मग फुटेल केविं तयाला
आक्रान्त फार ओढवला

खदखदा काळ तो हंसला । गरिबांचा वाली नुरला

मी धडपड केली फार । बाहेर पडाया तिथुनी
कर माझा धरुनी त्यानें । ठेविली उभी डांबोनी
होणार काय गति न कळे । दैवाची विपरित करणी

मराठी ग्रंथ संग्र
दा. नं.
ता.

व्याघ्रमुखीं धेनू जैशी
अधमा-करिं पडलें तैशी
करुं काय अशा समयासी
अब्रूवरि आला घाला । गरिबांचा वाली नुरला

बोलला नराधम मातें । "हे नाजुक माशुक पोरी
ही फेंक भिकेची झोळी । मज जवळी राही प्यारी
मोलाची माणिक मोती । देईन शालु जरतारी"
घालुनी अचानक घाला
झोंबला दुष्ट अंगाला
चांडाळ वैरि तो मेला
कथुं काय पुढें गे तुजला । गरिबांचा वाली नुरला

निरि हिसडुनि एक करानें । पावित्र्य भ्रष्ट मम केलें
देऊन दोष दैवाला । स्फुंदुनी स्फुंदुनी रडलें
तो प्रकार भीषण देवा । बेशुद्ध तिथें मी पडलें
उठवुनि मग मजला त्यानें
घातला धाक गुंडानें
"जरि शब्द काढशील" म्हणे
"क्षणिं ठार करिन मी तुजला । गरिबांचा वाली नुरला

× × ×



मराठी ग्रंथ संग्रहालय

काळाच्या जबड्यामधुनी । एकदां सुटोनी आलें
तों समोर दिसले सन्त । धाउनी तिथें मी गेलें
ही सारी कर्मकहाणी । कथितां ते "विठ्ठल" वदले
हे हिन्दूचे अभिमानी
धर्माचे पूर्ण ज्ञानी
ऐकुनि मम कर्मकहाणी
पाझर नच त्यांना फुटला । गरिबांचा वाली नुरला

"हिंदूच्या भर वस्तींत । हिंदूच्या या राज्यांत
संताच्या पुण्यक्षेत्रीं । शूरांच्या विक्रमभूंत
दुष्कृत्य होय तें सारें । कथिलें मी दरबारांत
दरबारीं अधिकाऱ्यांनीं
तिरस्कारयुत शब्दांनीं
"जा भिकार रांडे इथुनी"
हा न्याय दिला हो मजला । गरिबांचा वाली नुरला"

श्रीमान धनिक लोकांना । सत्तेच्या अधिकाऱ्यांना
अपमान मान वा अब्रू । त्यांच्याच माय भगिनींना
जे भिकार दीन दरिद्री । ना अब्रू काय तयांना ?

हे समाज भेद फुकाचे
हें तत्त्व नव्हे धर्माचें
हें ब्रीद नव्हे आर्यांचें
स्त्री जात एकना ? बोला । गरिबांचा वाली नुरला

हे समाजकंटक नष्ट । दीनास परोपरि छळिती
ते तसे गुंड कामांध । अबलांना गांजुनि जाती
ना उरला शास्ता कोणी । गरिबांना जगता वरती
" धिक् जिणें आर्य पुत्रांनो
धिक् स्वधर्म मार्तंडांनो
लाज ना काय षंढांनो "
दुःखांत दुःख हें मजला । गरिबांचा वाली नुरला

तव पोटीं आई मी गे । चांडाळिण जन्मा आलें
जन्मतांच हातोहात । कां नाहीं पट्कन् मेलें
भ्रष्ट असें लाजिरवाणें । जीवित हें असुनी नसलें
दुर्दैव पूर्वजन्मींचें
कीं फळ हें कृतकर्मांचें
ओढवलें मजवरि साचें
अपमान गिरी कोसळला । गरिबांचा वाली नुरला

ही ऐकुनि कर्मकहाणी । हंसतील, हंसो वा कोणी
कुणि दूषण देतिल मजला । देवोत बापुडे कोणी
कुणि असतिल करुणावन्त । आंसवें आणितिल नयनीं
धर्मांचे असतिल ज्ञानी
स्त्री जातीचे अभिमानी
हिंदूंच्या हिंदुस्थानी
उफळोत तयांच्या ज्वाळा । गरिबांचा वाली नुरला

वावरूं जगामधिं केवीं । हा भ्रष्ट देह घेउनियां
जगणें न हिताचें आतां । मज नको नको ही काया
येईन परत जन्माला । या पवित्र उदरीं तुझिया
मागतें हेंच देवाला
वंदितें तुझ्या चरणाला
वंदितें मातृभूमीला
कर जोडुनि सांगे सकलां । गरिबांचा वाली नुरला

आणिलेंच विष हें पाही । घेतें मी आतां आई
दीनांचा ईश्वर वाली । त्यावाचुन नच कोणीही
भो जगन्निवासा सदया । तव चरणीं ने लवलाही

घेतला विषाचा प्याला
देहाचा भडका झाला
चैतन्य दीप मालवला
शब्दच्छल मागे उरला । गरिबांचा वाली नुरला

पाहून दृश्य बालेचें । ती माय धरणिला पडली
फोडिली तिनें किंकाळी । सोनुली सोडुनी गेली
शीलाच्या मोलासाठीं । मोक्षाच्या मार्गा चढली
देउनी दान देहाचें
तोडुनी पाश जगताचे
सोडिलें उदक जीवाचें
पण प्रश्न तिचा घुटमळला । 'गरिबांचा वाली नुरला'

× × ×

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. [illegible] नं. [illegible]
ता. ..............
ठाणें.

( चाल—निज बाळा रे गाणें. )

गुणशीले हे सुभगे माझ्या बाळे ।
केलेस काय वेल्हाळे
किति वेळ गडे झोंप अशी घेणार ।
भिक्षेस होय कीं उशिर
तूं अशी इथें स्वस्थपणें निजलीस ।
घालील कोण पोटास
झणिं ऊठ गडे ऊठ अतां लवलाही ।
गुणवती ग माझी बाई
वदलीस मला "वृद्धपणीं तुज जननी ।
सांभाळिन सर्व परीनीं"
हे बोल तुझे फोल शेवटीं झाले ।
आघात करूनी गेले
गुण आठवुनी रडणें धाई धाई ।
मम नशिबीं आलें बाई
मज सोडुनियां करमत नव्हतें तुजला ।
कशि सोडुन जाशी मजला
तव बाळपणीं पुरली नव्हती हौस ।
पुरवीन पुढें ही आस
ती आस मना निराश करुनी गेली ।
जीवाची ज्योती विझली

ती दशा पतीची झाली
ही अशी करूनी गेली
दु:खाला दु:खें व्यालीं
या दैवाच्या अघोर आघातानें ।
जगणें हें म्हणजे मरणें

करुं काय अतां कोण संकटीं मजला ।
येईल धीर देण्याला

मम दु:खाची ये न कल्पना इतरां ।
काळाचा खेळचि सारा

मन बावरलें, शून्यचि सारें भासे ।
पूर्वकर्म माझें हांसे

या जगीं जगूं कोणास्तव मी आतां ।
ने सत्वर दीनानाथा

हा जहरि विषाचा प्याला
यांतला थेंब उरलेला
घेउंदे शेवटीं मजला

हे शेवटचे शब्द सांगतें सकलां ।
गरिबांचा वाली नुरला

× × ×

या दृश्यानें येतां जातां अजुनी ।
घुमतात शब्द हे कानीं
त्या शब्दांचें चित्र उमटलें हृदयीं ।
कवि माधव कवनीं गाई

---

मराठी ग्रंथ संग्रहालय,
वा. नं.
ता. ............
ठाणे.

# इतर कविता.

# अबोला.

सोडी अबोला म्हणी बोल कांहीं
वृथा रोष कां हा, जगन्मोहिनी !
मानूं कुठें मी समाधान माते—
अशी दूर कां राहसी लोटुनी.
त्वन्मूर्ति या मानसीं सांठवीली
न थारा दुजाचा तुझ्यावीण गे.
संसार नौका, प्रवासीहि नवखा
तरोनी कसा सिन्धु जाईल गे !
धिक्कारितां तूं अभागी जिवा या
जगामाजि थारा न कोठें मिळे.
वाटे कृपेवीण तूझ्या जगीं या
वृथा जन्म हा सौख्य तें कोठलें !
देऊनिया हात या दीन आर्तासि
शान्ती सुधा पाजवी एकदां.
त्वत्पादपद्मीं रमो चित्त माझें
न इच्छी कदा लौकिकी संपदा.

---

# वसुंधरेची ओंवाळणी

आज दिवाळी म्हणून कां ही वसुंधरा नटली
कुणा चालली ओवाळाया घाई कां झाली

आतां माझ्या ध्यानीं आलें, विश्वंभर भाऊ
त्या भावाला ओवाळाया, घालाया न्हाऊं,

वनराणी ही हरिततृणाचें रम्य वस्त्र ल्याली
जणुं हिरव्या दरि गोड खळ्या कां शोभतात गालीं

गडबड पाहुन वसुधेची ती मारुत दे शीळ
भान कुठें पण आहे तिजला एकचि तें खूळ

दंवबिंदूनीं वसुधा घाली न्हाऊं विश्वेशा
पुसावयाला वस्त्र ढगाचें निळसर दे ईशा

शुभ्र ढगाचा पाट, रांगुळी इंद्रधनुष्याची
ओवाळाया वसुधा बसवी मूर्ति परेशाची

प्रभातिंचा तो कुंकुम लावी ती प्रभुरायाला
प्रभातिंचे रविकिरण गुंफुनी माळ घालि प्रभुला

आकाशाच्या तबकांमध्यें निरांजनें दोन
त्यांत उजळिले तेजोमय ते चंद्रसूर्य जाण

नक्षत्रांच्या करुनि अक्षता टाकी प्रभुवरती
काय घातली प्रभुरायानें ओवाळणि तार्टी

× × ×

सांगा, सांगा, रसिकांनों, हें उलगडाच कोडें
धन्य धन्य चातुर्य तयाचें सोडवि जो कोडें

# विधिची कारागिरी

थांब जरा लाजरी। पाहुंदे विधिची कारागिरी

सौंदर्याची मूस सांडिली
विधी ओतितां हातामधली
स्वर्गातुन ये रस कां खालीं
तयाची मूर्ति गोजरी। पाहुंदे विधिची कारागिरी

कां चपलेला दृष्ट लागुनी
मेघांचे तट फोडुनि अवनी
पडली कां ही विश्वमोहिनी
विश्व दिपवणारी। पाहुंदे विधिची कारागिरी

गगनांतिल ढग काळे पिंजुन
केस विरचिले कां हे त्यांतुन
संततधारा जणुं ही श्रावण
शोभे शीर्षावरी। पाहुंदे विधिची कारागिरी

आकाशांतिल दौलत फोडुन
विधी आणि कां त्यांतिल चोरुन
दोन चांदण्या—त्यांचें कोंदण
बसवी नयनांवरी। पाहुंदे विधिची कारागिरी

गुलाब गालां आंत लपविलें
कांट्यांचें नच भान राहिलें
कांटे रुतुनी रक्त सांचलें
चिमण्या गालांवरी । पाहुंदे विधिची कारागिरी

अभिनव नाजुक मांगल्याची
मोहक मूर्ती कोमलतेची
ल्यालि भूषणें वसुंधरेची
वसुधा चेतो हरी । पाहुंदे विधिची कारागिरी

निष्पापाची नयन मनोहर
छबी हांसरी हो दृग्गोचर
पावित्र्याची प्रतिमा सुंदर
शोभे गौरीपरी । धन्य ही विधिची कारागिरी

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

# प्रेमाची खैरात

आहे मंगल आज संक्रमण हें सानंद सारे जन
अन्योन्या तिळगूळ गोड करिती अन्योन्य संतर्पण

वेडा हा व्यवहार सर्व बघुनी हासे मनाच्या मनीं
प्रेमव्यक्त अशा परी करुनियां संक्रांत होई जनीं ?

शुद्ध प्रेम मनांत वास करितें तें लोकिं दावावया
बाह्यात्कारिं वदोनि ढोंग करणें हें पाहिजे कासया ?

अर्पाया तिळगूळ त्यास नलगे सत्प्रेम ज्या अंतरीं
कां ही प्रेम विटंबना करितसा ? संक्रांत नोहे खरी

बाह्याचार नको, नकोच असली रूढी खुळी निर्बल
ठेवा दिव्य सदैव जागृत हृदीं सत्प्रेम तें निर्मळ

---

# अरुणोदय

अजुन वाट पाहुं किती अरुणोदय होइना
होई पण भास मना कांहिं मज कळेना

अंधकार चोहिकडे
घूत्कारित हीं घुबडें
दाविति भय रात किडे
कर्कश रव त्यांचा तो मजसि ऐकवेना

गुरुशुक्रादिक सगळे
सप्तऋषी मावळले
बघुन दृश्य हृदय उले
काय करूं घोर तिमिर हाय ! पाहवेना

देशास्तव राष्ट्रमुनी
द्यावयास अर्घ्य नमुनी
मीहि उभा खिन्न मनीं
पारतंत्र्य घोर रात्र अजुन कां सरेना

---

# मित्रास—

भेटायास्तव यावया म्हणुनिया आलें तुझें पत्र तें
येऊं सांग कसा ? अकिंचन पुरा, मत् चित्त हें पोळतें
त्यागोनी अभिमान सर्व करितों सेवा दुजांची सदा
काव्यीं चित्त कसें रमेल मग हें भोगीतसे आपदा

देऊं दोष कुणा ! जगीं रखडणें हे पोट कीं जाळणें
हांजी हांजि म्हणोनिया जनपदीं माथा मुदें वाहणें
आणोनी मुखिं हास्य अश्रु पुसणें भारावलेल्या मना
होई शांत म्हणोनि बोध करणें साहूं किती यातना

मोठी आवड काव्य लेखन खरी ना द्रव्य हातीं मुळीं
लोकां दाउं कशा करोनि कविता माझी मती भागली
आशेची जळते चिता धडधडे ज्वाला पहा चाटती
दीनाते जगिं वालि कोण न दिसे दुःखाश्रु हे दाटती

---

# दग्ध आशा

होते हेतु मनांत फार दिवसांपासून संगें तुझ्या
थाटावा सुभगे नवोदित असा संसार लोकांत या
केले आजवरी मनोरथ किती सारेच ते भंगले
आशा दग्ध मनींच काय मरणें दैवी असेना कळे

आल्या आजवरी अनेक ह्रदयीं सत्कल्पनेच्या सरी
गेल्या त्या वितळून पार ! सुभगे, त्या घोर कालोदरीं
त्वत्पाणिग्रहणार्थ हा कर पुढें केला खऱ्या प्रीतिनें
ओढी गे पण काळ निर्दयपणें, छे ! तें नको बोलणें

ज्या आशेवर जीव आजवर मी कंठीत होतों जगीं
ती आशा ह्रदयींच हाय जळली ना सौख्य गे या युगीं
त्वन्नाम स्मरणें मना रमविणें या भग्न चित्ताचिया
नेवो नेइल काळ तो कधि तरी गे दग्ध आशेंत या

# विनोद

बाला एक दिनीं वनीं विहरतां
पुष्पें स्वहस्तांतुनी
आणी व्यक्त करावयास अपुला
प्रेमा पतीकारणीं
वेंचोनी सुम एक सुंदर स्वयें
देई स्वनाथाकरीं
बोले जोडुनि हात 'घ्या सुमन हें
नाथा ! सुगंधी करीं'

हातीं पुष्प धरोनि नाथ वदला
' हे लाडके, सुंदरी
देई गे ! करिं पुत्ररत्न दयिते
या रम्य पुष्पापरी'
बाला ऐकुनी लाजली हळु वदे
'ही काय थट्टा गडे
जातें मी' वदुनी हळूच बघते
चोरून नाथाकडे.

# एव्हां कीं तेव्हां

एव्हां व्यर्थ करीत काय बसलां
संक्रांत ही साजरी ?

जेव्हां जाइल वैमनस्य सगळें
जातीतलें हें दुरी;

केव्हां स्थापुं गत-स्वराज्य फिरुनी
स्वातंत्र्य भोगूं खरें

तेव्हां सर्व मिळोनि संक्रमण हें
आम्ही करूं साजरें

मराठी ग्रंथ संग्रहालय.
वा. .......... नं. १०८८
ता. ..............
ठाणें.

# दिपवाळी

कशाची आतां
आतां दिपवाळी
पेटली दैन्याची होळी

लोपला सारा
सारा आनंद
जगामधि चाले आक्रन्द

अशा या काळीं
काळीं दिपवाळी
कशाला आली अवकाळीं

संपदा गेली
गेली सोडूनी
दिवाळी नच आम्हां म्हणुनी

नाहीं हो आम्हां
आम्हां स्वातंत्र्य
आम्हि हो आहों परतंत्र

कशाची आतां
आतां दिपवाळी
पिकली इतरांची पोळी

अरे हे कोण
हे जन अस्पृश्य
लोटतों दूर म्हणुनि त्यांस

जाती अन् धर्म
धर्म कुणी केले
पहा त्या देवांनीं केले

नाहीं हो केले
केले देवांनीं
बनविले पापी रूढींनीं

रूढिच्या बंदी
बंदी जखडून
पहा हे मरती तरफडुन

कशाची आतां
आतां दिपवाळी
पेटली कलहाची होळी

---

# अभागी जीवन

अभागी जीवाचें जीवन
शोक हा नावरे रात्रंदिन

मायपिता मज सोडुन गेले
आप्तेष्टांनीं दूर लोटिले
स्नेह, सोबती सर्वहि त्यजिले
या जगांत प्रेमाविण
अभागी जीवाचें जीवन

संसाराची सखी सोबती
दोन अर्भकें सोडुन जगतीं
तींही गेलीं स्वर्गावरतीं
खेळ काळाचा निर्घृण
अभागी जीवाचें जीवन

संसाराचें छत्र ढासळे
धाय मोकली दोन्ही बाळें
ऐकोनी तें हृदय उन्मळे
मायेच्या माउलीविण
अभागी जीवाचें जीवन

सुख सोईला सर्व सोबती
दु:खीं आतां कुणी न येती
पाहुनि मजला तोंड चुकविती
फोल तें सारें आश्वासन
अभागी जीवाचें जीवन

माध्यान्हींची वेळ टळाया
दुसऱ्या दारीं निलाजरें या
लाजिरवाणा जीव जगाया
करावें लागे भिक्षाटन
अभागी जीवाचें जीवन

आया बाया दारीं येउनि
अपशब्दाचे बोल बोलुनि
घासभरा या अन्नाकारणिं
बोलती तोंड वेंगाडुन
अभागी जीवाचें जीवन

कसेंबसें तें अन्न कोंबणें
खातांखातां अश्रु सिंचणें
अशापरीनें जीव जगविणें
वद कोणतें कारण
अभागी जीवाचें जीवन

काळा कां तूं स्वस्थ असारे
येईना कां दया तुलारे
किती पाहसी अंत असारे
घालिशी कंठीं कां पाश न
अभागी जीवाचें जीवन

# हसरें फूल !

हें सुमन गुलाबी हंसतें, डुलतें पाही !
जगिं सुखदु:खाची जाणिव याला नाहीं !

या ध्येय एक कीं गंध परांना देणें
नच स्वार्थासाठीं या जगिं याचें येणें

पदिं चुरगळलें तरि खेद न वाटे कसला
मातींत मिळे तरि, जाणिव मुळिं नच याला

कुणि रमणी खुडुनी केशकलापीं ठेवी
सौंदर्य खुलविण्या कारण तूंची दावी

वाटिकेमधिल तूं शोभसि वैभवि राणा
या इतर लता बघ ! करिती तव सन्माना

हा पवन वाहतो नेई गंध हरोनी
रसिकांस तोषवी धन्य अससि तूं भुवनीं

तूं हांस असाची खंड न पाडी सुमना !
डोलवोत कवि तुज पाहुनि मोदें माना.

---

# ग्रहण

ग्रहण लागे सूर्यास स्वर्ग लोकीं
दानधर्मा करितात मृत्युलोकीं
करिति जन हे जपजाप्य तर्पणादी
काय घडतें पुण्य कीं पाप आधीं

कुठें रवि तो अन् कुठें राहु–केतू
कुठें आम्ही हे क्षुद्र इथें जन्तू
असे नित्याचें ग्रहण चंद्र–सूर्या
वेळ नाहीं कीं लागण्या सुटाया

पारतंत्र्याचें ग्रहण आर्यभूला
किती शतकें लागलें छळायाला
कुणी देहाचें दान तया केलें ?
कुणी कारागृह स्वर्गतुल्य केलें

ग्रहण लागे अस्पृश्य बांधवांना
राहु केतू अम्हि छळितसों तयांना
बाल विधवांना दीन अनाथांना
ग्रहण लागे धनहीन मजूरांना

अजुनि ग्रहणें किति दिसति भारतांत
दृष्टिपुढतीं तीं उभीं मूर्तिमन्त
ग्रहण कलहाचें लागलें अघोर
सुटुन केव्हां स्वातंत्र्य लाभणार

× × ×

ग्रहण सोडुन हें जवळचें भयाण
गगनिं बघतो कीं दृष्टि लांबवून ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय.
वा. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

# अवदसा !

लागून नादिं या तुझ्या अये अवदसे
फसलोंच परी तें आतां सांगु मी कुणाला कसें ?

अशी कशी घातली तूं हि मला मोहिनी
कल्पना न करवे मातें मतिमंद होय मी मनीं

जडलाच छद हा तुझा ध्यास सारखा
रात्रंदिन दिससी डोळां क्षण एक न जाई फुका

किति सुखांत होतों अम्ही घरकुलांत या
सहचरी बाळ सांगाती संसार होय स्वर्ग हा

तव संगत जडतां क्षणीं सौख्य लोपलें
संसार दुःखमय झाला कां कसें तेंहि ना कळे

ही अगाध तव गे कृती धन्य चातुरी
भाळुनी जीव तव नादें हो पिसाट वेड्यापरी

तूं खरी प्रतापी बये जादुगारिणी
मज समान किति लोकांना झुलविशी कोणत्या गुणीं

टाळेन संगती तुझी म्हणे मी किती
तों उलट दुणावे बाई ! ही तुझी दुष्ट संगती

गणगोत मित्र त्यागिले पायिं मी तुझ्या
मी तुझ्याच करितां बाई आपदा किती सोसिल्या

जाईन कुठें मी तिथें पाठिं लागसी
या जनीं विजनीं बाजारीं ही किती धिंड काढिसी

एकान्तीं बसलों जरी प्रियसखीसवें
हटकून तिथेंही येशी साधण्या वैर तिजसवें

गुणगूण ऐकतां तुझी म्हणे ती मला
घालवा सवत बाहेरी खपणारच नाहीं मला

किति मत्सर दोघीमधें काय मी करूं
सोडुं मी कुणाला सांगा, सांगाच कुणा मी धरूं

कधिं नेसि मला भुलवुनी गिरी-कन्दरीं
तेथेंच बसवुनी जासी, तूं कुठेंच अभ्यन्तरीं

स्वप्नांत येउनी कधीं मध्यरात्रिला
उठविशी सांगशी कांहीं जें नवेंच सारें मला

किति लपंडाव तूं असे खेळसी गडे
हा पुरे खेळ तव आतां हैराण प्राण बापुडे

कुणि म्हणोत तुज शारदा स्फूर्ति नंदिनी
अवदसे ! चेटके ! बाई ! बुडविलेंस मज त्रिभुवनीं

---

# धर्म

‘ धर्म बुडविला महात्म्यांनीं
अधर्ममय ही केली अवनी
धर्मघ्नचि हे ’ ऐसे म्हणुनी
कलकलाट कां उगाच करिता ?
अर्थ नसे त्यांत

धर्माचीं हीं सारीं सोंगें
तयांत दडलीं अनेक बिंगें
विचार करितां शान्ति, दुभंगे
असे असूनी धर्माचे जन
माजविती बंड

किती जगाची केली हानी
धर्माच्या या अवधूतांनीं
दुर्दैवचि कीं न कळे अजुनी
आव आणिती धर्माचा पण
“ स्वधर्म मार्तंड ” !

राष्ट्रधर्म ना जिथें जिवंत
त्या धर्माच्या साम्राज्यांत
धर्म–वल्गना करित अहांत
धर्माच्या त्या खऱ्या स्वरूपा
गेला विसरून !

धर्मध्वज रक्षणार्थ कोणी
प्राण अर्पिले शर्थ करोनी
भितां कायदे येता वरुनी
वृथा मारितां फुशारकी कां?
धर्म धर्म म्हणुनी

कसें कळेना सत्ताधारी
खुशाल फिरती देव-मन्दिरीं
आडवे न त्या कुणीच दारीं
त्या वेळेला स्वधर्म कोठें
जातो समजेना!

अनाथ दुबळ्या अस्पृश्याला
छळता विसरुन माणुसकीला
धर्म रहातो इथें कशाला
कधींच गेला धर्म, भारतीं
येतां परचक्र

श्रुति स्मृतीचा द्रुम हा वठला
कशास पाणी घालित बसला
समतारूपी लावा तरुला
फोंफावूं दे उंच उंच तो
कळुंदे दिक्काला

# मोहिता

मज कशि ग पडे मोहिनी
सखे त्या बघतां बघतां क्षणीं ॥ धृ० ॥

ते कोण आणि कोठलं
मज मुळीच ना उमगलं
पण हृदयीं माझ्या प्रबळ उफाळे प्रीत तोंच साजणी

मी सहज उभी अंगणीं
ये अवचित सदना कुणी
परि बोलुं कशी मी सांग तूं तरी लाज दाटली मनीं

परतले जावया पुढं
फिरुन बघे मजकडं
मीहि बघत ग उभी राहिलें वेडावुन त्या क्षणीं

मोहक मुख पाहुनी
हरपलं भान साजणी
खळबळ मनिं या काय उडालं सांगुं कसं वर्णुनी

मी खरं सांगुं कां "जना"
पण सांगुं नको तूं कुणा
निघून जावं त्यांच्या संगं आलं माझ्या मनीं

या मनिंच्या त्यांना गोष्टी
कळवाया माझ्या साठीं
दया करुन तूं जाशिल कां ग सांग झणीं मैत्रिणी

जाउनी सांग तूं अशी
नजरबंद केलि कुणाशीं
तीच तुम्हावर मोहित होउन झुरते रात्रंदिनीं

ना भेट अतां होइल
सखि माझी खास मरेल
बघवेना ती तळमळ म्हणुनी "आलें शोधित धनी"

मी वेडि नव्हे कां ग ?
कां पुसूं नये तेव्हां सांग
नांव गांव त्या कोण कोठचें कुठं जायचं धनी

किति सोसुं गडे ताप हा
होईल भेट कां पुन्हा
भविष्यवाणी बोलुन मजला शांत करी साजणी

ते व्हावेत जिवाचे धनी
एवढीच आस मन्मनीं
परि दैव कुठं ग माझं इतकं मी तर वनवासिनी

ते कसे ग होतिल धनी
दिसतात थोर नरमणी
आम्हि तर असलं गरीब बाई लाभावं कसं गुणमणी

कां म्हणतिस होतिल धनी
पुरविल कां आस भवानी
पुरवूं देग अंबा माझी भरिन ओटि तिज पांच फळांनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. ........ नं. २०८८
ता. ............
ठाणें.

---

# बेंदूर

काय सांगुं सखये आतां बोलुं तरि काय ग
द्वाडपणा यांचा बाई जायचा कधीं ग ॥ ध्रु० ॥

लेकरासी नसती कुडतीं
बोटभरी अंगावरतीं
परी हवं यांच्या बैला झूल भरजरी ग

घरीं नसे मुठभर दाणा
घालुं काय मी बाळांना
परि घालति वांसरांना रोज हरभरे ग

गळां नाहिं माझ्या मणी
हसति मला आयाबहिणी
पण बैला गळ्यामंदीं चांदिची ति चाळ ग

पाहिलास आमुच्या घरचा
सण काल बेंदूराचा
मिरवणूक बैलाची ती ! बादशाहि थाट ग

मैतर समदं जमवूनी
काल केलं नीशापाणी
निशेंत त्या नाचे धनी होऊनी बेभान ग

होतं नव्हतं समदं गेलं
घर असं उघडं पडलं
व्यसनं काय थोडीं थोडकीं सांगुं तीं किती ग

डोकीवर मंदिल मोठा
हातामंदि घेउन सोटा
फिरे जसा गावामंदी पाटिल कीं काय ग

नको काम करायाला
शेतामंदी राबायाला
चैन कशी चालायाची उदीम ना कुठं ग

दोन गोष्टि सांगुन तूं तर
बघ तकडं माझ्या खातर
नाहीं तर दिसतं आहे पूढचं नशीब ग

---

# सांत्वन

करुं नको सख्या चिंतन
जातील दिवस द्वाड हेही पण

जाउं दे गेलि चाकरी
शोधुंया कोठें तरी
मिळेल तोंवर जाइन धनि—मी रोज मजूरीनं

करुं नको सख्या चिंतन
तें पुरे बिगारी जिणं

चिंतन वृथा कशास करणं
ठेवील प्रभू तो तसं राहणं
सुखदु:खें हीं पूर्वजन्मिच्या मिळती सुकृतासम

करुं नको सख्या चिंतन
होणार काय चिंतुन

हीं संकटं नाहींत कुणा
चुकलीं न देवदेवांना
रामप्रभू पण गेले ना ते तुडवित सारें वन

करुं नको सख्या चिंतन
त्यापुढें काय आम्हीं जन

त्या पांच पांडवावरी
किती घोर संकट तरी
करि दुर्योधन पांचालीचें सभेंत विडंबन

करुं नको सख्या चिंतन
कोण साह्य हरीविण

सुख नाहिं मुळीं धनिकांत
सुख नसे राजवाड्यांत
पहा नांदतें झोपडीमाजी सुखातें रात्रंदिन

करुं नको सख्या चिंतन
हेंच अमुचें नंदनवन

संसार सिंधु हा पहा
किति दुथडी भरला अहा
यांतुन जाणें पैल तिराला सोपं दिसतं पण—

करुं नको सख्या चिंतन
पाडिल पार प्रभू सुखें यांतुन

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना. क. ५१४१
मुंबई शाखा (स्थापना

लेंकरं हीं घरीं गोजिरीं
हींच राया दौलत खरी
यात्रिण धन तें काय जाळणं हींच सुखा साधन

करुं नको सख्या चिंतन
जातिल दिवस द्वाड हेही पण

# मृत्यूस—!

येरे ये मरणा नको दावुं करुणा
तुझा क्रूरपणा पाहूं तरी

ग्रासुं पाहतोसी गुणवन्ता लागीं
तुझी रीत जगीं प्रसिद्ध ही

हा मी पहा ऊभा सिद्ध तूझ्या पुढें
दाखवि केवढें बळ तूझें

डोळ्यांनीं मी अंध हात पाय पंगू
आणि काय सांगूं—सांग; तुला

असा मी असतां अनंत दुर्बळ
भीसी कां जवळ यावयास

जग धिक्कारीलें तूंहि धिक्कारीसी
जाऊं कोणा पाशीं सांग आतां

# प्रभो ये तातडी

प्रभो ये तातडी । ही नाव लावरे पैलथडी

संसाराचा अफाट सागर
आपत्तीच्या लाटा भयकर
विचार वारा वाहे दुस्तर
यातुन जाइल कशि होडी । ही नाव०

मोहरूप हें वादळ सुटलें
आशा सागर भव्य उसळलें
चंचलतेचे मेघ डवरले
त्यांत सांपडे ही होडी । ही नाव०

अनंत छिद्रें या होडीस
नाना व्याधी नांवें त्यास
अज्ञ सुकाणू मी, समयास
तशांत पाणी ही दुथडी । ही नाव०

मध्य सागरीं नाव अडे ही
ऐल थडीना पैल थडीही
इथेंच बुडुनी जाइल पाही
बुडव तार वा याच घडी । ही नाव०

---

# अभागिनीचे अश्रू

कोणी एक असे गरीब विधवा घेवोनि बाळा कडे
होती केशयुता न कुंकुमपरी दृष्टीं जनाच्या पडे

गेली दैववशा सखीसह अहा ती देवता दर्शना
दीर्घायू करि बालका म्हणुनियां प्रेमें करी वंदना

हर्षें बाळ बहू बघे चहुंकडे आनंदला मानसीं
नाना पाहुनिया पदार्थ करितो नानापरी चौकशी

तों कांहीं जमुनी स्त्रिया सुखभरें लावोनियां कुंकुमा
होत्या तेथ सभर्तृका प्रभुपदां वंदोनि घेती क्षमा

दुर्दैवें अबला अनाथ अपुली त्या अंतरे आदरा
झालें तोंड कलाविहीन नयनीं ये अश्रुचाहि झरा

बोले बालक त्यामधें निरखुनी मातेकडे घाबरें
आई कुंकुम लावती न तुजला कैंवी स्त्रिया ह्या बरें

ऐकोनी वच हें स्वभालपटला स्पर्शोनि तेव्हां करें
बोले केवल ईश्वरी अवकृपा ही होय बाळा बरें

---

# तिचें वेड

दारीं राहुन वाट पाहत कुणी उत्कंठिता सुंदरी
गालींचा खुलला गुलाब नव तो आली खरी माधुरी

हातीं शोभत पुष्पमाळ बरवी चांचल्य त्या लोचनीं
वाटे ही कुणि देवता महिवरी आली त्वरें धाउनी

काळी चंद्रकळा सुगौर तनु ती शोभे तियेच्यामुळें
नाहीं न्यून्य कशांत रम्य पुतळी मत्चित्त संतोषलें

ते पाठीवरि मुक्तकेश कुतुकें वायूसवें खेळती
जाणोनी फुलता गुलाब तिजला भृंगावली गांजती

" वेड्यांनो ! उगि कां मला छळितसा व्हा दूर सारे कसे
नोहे प्राप्त तुम्हास वस्तु मुळिं ही मोती बकारा नसे "

होते वारि परी न भृंग निघती रूपास जे भाळले
ते वेडे बनुनी असेच फिरती ज्या वेड हें लागलें

# लाजाळूस

किती लाजते तरी । “ पोर ग मुलखाची लाजरी ”
नीट नेटकें पातळ नेसुन
मोठालेंसें कुंकुं लावुन
नमस्कार कर त्यांना जावुन
बैस जाजमावरी । पोर ग मुलखाची लाजरी

चुळबुळ अगदीं न करी तेथें
पुसतिल तुजला कांहिं तरी ते
विचारपूर्वक सांग गडे तें
लाजुं नको तिळभरी । पोर ग मुलखाची लाजरी

ना तो अजुनी नवरा झाला
कां लाजावें अतांच त्याला
कितीक बघतिल असले तुजला
किती लाजते तरी । पोर ग मुलखाची लाजरी

---

# चुकलेला वायदा

झालें म्लान मुखाब्ज कां थबकले अश्रू गडे लोचनीं
लज्जेचा पडदा दुराउन उभी कां तूं अशी भामिनी !

स्कंधींचा सरला तरी पदर तो ना भान कां सुंदरी
कां तूं निश्चल सारखी उभि अशी निःशब्द जादूपरी

कां प्रीती रतिरंगणांत रुसवा धमकावणी ही अशी
चाले मन्मथजन्य काय असली लीला तुझी गौष्यशी

शब्दातीत करीतसे विनवणी इन्कार सर्रास दे
प्रीतीचा रुसवा सरेल कधीं हा सांगा तरी वायदा

ऐसा तो अपराध काय घडला हातें मनोमोहिनी !
येई निष्ठुरता कुठोनि इतकी तूं सांग हृद्गामिनी !

प्रायःश्चित्त मिळे पुरेपुर, गडे सोडोनि ही मुग्धता
ये ये ये हृदयेश्वरी ! हृदयींची माल्कीण तूं गे अतां

घेवोनी मणिबंधनांत मजला चुंबोनि बोले तदा
" जातांना कधि यायचा ठरविला होता गडे वायदा "

# चोर

वा. नं.
ता.
ठा. नं.

येई माझ्या घरीं। सखे ग चोर कोठला तरी

कोणी नव्हतें मम घरव्यांत
साधुन संधी तो ये आंत
झालें अगदीं मी भयभीत

कंप सुटे अंतरीं। सखे ग चोर कोठला तरी

शोधुन पाहे अवतीं भवतीं
मुळीं न लागे धन त्या हातीं
चिडला मग तो माझ्यावरतीं

काय करूं मी तरी। सखे ग चोर कोठला तरी

दरडावुन मज पुसूं लागला
" सांग कुठें तव धन दे मजला
पहा नाहितर " मला म्हणाला

धाडिन स्वर्गावरी। सखे ग चोर कोठला तरी

दीन दरिद्री घराभोंवतीं
तरुण चोर हे असे घेरती
पुंडाई कां बाई इतकी

काय कळे ना तरी। सखे ग चोर कोठला तरी

# दीपावली

ज्या देशास स्वतंत्रता मुळिं न ही अद्याप ती लाभली
स्वातंत्र्याकरितां पटाट मरती वीराग्रणी ज्या स्थलीं

स्वातंत्र्याकरितांच ही भडकली होळी स्वदेशावरी
ऐशा घोर तमीं बसून करु कां दीपावली साजरी

आम्ही बंधु समान सर्व असतां कोणी म्हणे ब्राह्मण
हा अस्पृश्य म्हणून कोण हिणवी हा कोण अब्राह्मण

नाना व्यर्थ वितंड वाद करितां मांगल्य हे संहरी
नाहीं ऐक्य तिथें किमर्थ करणें दीपावली साजरी

रूढीचे सगळे गुलाम दुबळे रूढीस आलिंगिती
रूढीनेंच कितीक दीन अबला खाईमधें लोटती

ऐसी घातक रूढि जोंवर इथें नांदे सदा तोंवरी
हा हा हे नयनीं बघून करु कां दीपावली साजरी

---

# व्यवहार

मायेच्या बाजारीं, हवें तें मिळेना
नको तें तें मना दृष्टीपुढें
येतां जातां वाणी, काय हवें तुम्हां
पुसतसे आम्हां सारखें तें

काय सांगूं देवा, हवें जें तें यांना
स्वार्थलोलुपांना सांगूं कैसें
आतां माझें मज, केव्हां गवसेल
हीच तळमळ जाळी मना

होतें धन थोडें, दिलें यांच्या हातीं
आहे हें मागती, देऊं कैसें
विसंबूनी देतों, राहिलें हें धन
देवा नारायणा ! तुम्हापासीं

पापाचिया पापा, देवा मायबापा !
नका देऊं थापा तुम्ही मज
घ्या हें माझें धन, पहा निरखून
नको मागाहून, भांडण तें.

# श्रीमहाराष्ट्र शारदेस—

कोणी अर्पिति ते गुलाब तुजला
कोणी कवी मोगरी
कोणी कुंदकळ्या कुणी बकुल ते
माझी कण्हेरी परी

नाहीं सुंदर वा सुंगधित तरी
तूं कौतुकें स्वीकर
प्रार्थी **माधव** हा पदांबुजि तुझ्या
जोडोनि दोन्ही कर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वा. नं.
ता.
ठाणे.
REFBK-0005141
REFBK-0005141
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५१८९

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

# आम्ही प्रकाशित केलेलीं पुस्तकें.

---

**अभिनय कला, नाटविभाग—किंमत १२ आणे.**

लेखक—दा. बा. मिरजकर.

---

ए. व्ही. देसाई, एम्. ए. कृत

**इंग्लंड व हिंदुस्थानच्या इतिहासाचीं प्रश्नोत्तरें.**

**किंमत १॥ रुपया.**

---

**ब्रिटिश राज्याची रूपरेखा—किंमत ६ आणे.**

**ब्रिटिश हिंदुस्थानची राज्यव्यवस्था. ( सचित्र )**

**किंमत ८ आणे.**

---

**पाढ्यांचे खेळ ( सचित्र ) किंमत ३ आणे.**

लेखक—वि. कृ. नेरूरकर, बी. ए., एस. टी. सी.

---

# आमचेकडे मिळणारीं इतर पुस्तकें.

**धर्म—मंथन. किंमत १ रुपया.**

ले. महादेवशास्त्री दिवेकर.

---

**लीलेचा संसार—सामाजिक खंड काव्य—किं. १२ आणे.**

ले. त्र्यंबक गंगाधर घारपुरे.

---

**नाट्यछटा—किं. ४ आणे.**

ले. अ. जि. कामतनूरकर.

---

**आधुनिक स्त्रिया आणि रंगभूमि—किं. ४ आणे.**

ले. व्यं. गो. अंदूरकर.

---

**डी. एन्. मोघे,** बी. ए.

**प्रो., स्कूल ॲन्ड कॉलेज बुक् स्टॉल, कोल्हापूर.**